**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक १६/०४/२०२६**

आलोसे - रतन नामदेव शेलार, वय ४७ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद वाहतुक निरीक्षक, ( वर्ग क ) राज्य परिवहन महामंडळ, परभणी आगार ता.जिल्हा परभणी, यांनी तक्रारदार यांच्याकडून ५००/- रूपये लाच स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | परभणी. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे कोतवाली जि. परभणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | रतन नामदेव शेलार, वय ४७ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद वाहतुक निरीक्षक, ( वर्ग क ) राज्य परिवहन महामंडळ, परभणी आगार ता.जिल्हा परभणी. |
| लाच मागणी रक्कम | ५००/- ( पाचशे रूपये ) |
| लाच स्विकृती रक्कम | ५००/- ( पाचशे रूपये ) |
| सापळा अधिकारी | श्री.महेश पाटणकर, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि. परभणी |
| तपास अधिकारी | श्रीमती मनिषा पवार, पोलीस निरीक्षक, लाप्रवि. परभणी |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांना मित्राच्या लग्नाला जाण्यासाठी एक दिवसाची रजा मंजूर करणेकामी. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी दि. १५/०४/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार हे परभणी आगार येथे चालक या पदावर कर्तव्यावर असून त्यांना दि. २१/०४/२०२६ रोजी मित्राच्या लग्नाला जाण्यासाठी एक दिवसाची रजा मंजुर करण्यासाठी वाहतुक निरीक्षक रतन शेलार रा.प. परभणी आगार हे ५००/- रूपये लाचमागणी करीत असलेबाबत तक्रार प्राप्त झाली.<br>. त्यावरून दि.१६/०४/२०२६ रोजी पडताळणी कार्यवाही करीता तक्रारदार व पंच क्रंमाक १ यांना लोकसेवक यांचे राज्य परिवहन मंडळ आगार बस स्थानक परभणी कार्यालय येथे भेट घेण्यासाठी पाठविले. त्यावेळी लोकसेवक शेलार यांनी तक्रारदार यांना ५००/- रू. लाचेची मागणी पंच क्रंमाक ०१ यांचे समक्ष केल्याचे निष्पन्न झाले.<br>दिनांक १६/०४/२०२६ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान बस स्थानक परभणी येथील वाहतूक निरीक्षक यांचे कक्षात लोकसेवक शेलार, यांनी तक्रारदार यांचेकडून ५००/- लाचेची रक्कम पंचा समक्ष स्वत: स्विकारलेवरून आलोसे यांचे विरूध्द पो.स्टे कोतवाली येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच आलोसे यांच्या घराची घरझडती घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री.संदीप पालवे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक कदम, ला.प्र.वि नांदेड परिक्षेत्र नांदेड, यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री. महेश पाटणकर ला.प्र.वि परभणी, यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी सहा.फौज/निलपत्रेवार, पोना/१३९७ बेंद्रे, पोशि/१००५ नागरगोजे, पोशि/१६६५ घुले, चापोशि/१४ लहाडे ला.प्र. वि. परभणी यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- १) **मा. पोलीस अधीक्षक**, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड |
| | :- २) कार्यालय पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी<br>नानलपेठ पोलीस स्टेशनच्या बाजुला , शनिवार बाजार, नानलपेठ परभणी. |
| ई - मेल | :- १) spacbnanaded@mahapolice.gov.in<br>२) dyspacbparbhani@mahapolice.gov.in दुरध्वनी क्र :– 02452 & 220597 |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- acbmaharastra.net टोल फ्रि क्रंमाक १०६४ |
| पोलीस अधीक्षक | :- ९२२६४८४६९९ |
| पोलीस उप अधीक्षक | :- ९८७०३१३१५७ व्हॉटसअप क्रंमाक - ९२७२२११०६४. |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel<br>@ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो परभणी

(महेश पाटणकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी